दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

SHREE VAIBHAVLAXMI ENTERPRISES

URGENTLY REQUIRED
MALE CANDIDATES - FOR PROPERTY REGISTRATION
WORK IN PANVEL AND NAVI MUMBAI
MALE CANDIDATES - OFFICE BOY
MALE/FEMALE CANDIDATE -
FOR XEROX MACHINE OPERATOR WITH BASIC COMPUTER KNOWLEGE
E-MAIL-shreevaibhavlaxmienterprises@gmail.com MOB.NO. 9892848890
ADD. - SHOP NO.02, GROUND FLOOR, BULAND 2,
PLOT NO. 22, SECTOR 5A, NEW PANVEL, RAIGAD 410 206.

वर्ष २० वे | अंक १६३ | MAHMAR/2006/17212 | रायगड | रविवार, दि.३१ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित


# मनोज जरांगेंच्या आंदोलनाला आणखी एका दिवसाची परवानगी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे. मनोज जरांगे यांचं सध्या मुंबईत आझाद मैदानात उपोषण सुरु आहे. त्यांच्या उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाच्या निमित्ताने हजारो मराठा आंदोलक मुंबईत ठाण मांडून बसले आहेत. आझाद मैदान, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई महापालिका बाहेरील संपूर्ण परिसर हा आंदोलकांनी वेढलेला आहे. त्याचदरम्यान, एक मोठी समोर आली आहे, ती म्हणजे मनोज जरांगे यांच्या आंदोलनासाठी आणखी एका दिवसाची परवानगी मिळालेली आहे. आझाद मैदानातील आंदोलनासाठी आणखी एका दिवसाची परवानगी मिळालेली आहे. जरांगे यांच्या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी आणखी एका दिवसाची परवानगी दिली आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचं वातावरण पाहायला मिळत आहे.**

मनोज जरांगेंच्या उपोषणाला महाविकास आघाडीतील अनेक नेते, आमदार व खासदार भेट देऊन आपली भूमिका मांडत आहेत. शिवसेना नेते आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी काल आणि आजही मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनस्थळी भेट देत त्यांच्यासोबत चर्चा केली.

आजच्या भेटीत शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी त्यांनी फोनवर बोलणंही करुन दिलं. दीड ते २ मिनिटे मनोज जरांगे पाटील यांचं उद्धव ठाकरेंसोबत फोनवर बोलणं झालं आहे.



त्यामुळे, दोन्ही नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा झाली? काय बोलणं झालं? याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानातील आमरण उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी आपला निर्धार कायम ठेवला आहे. सरसकट मराठे कुणबी असल्याचा जीआर काढल्याशिवाय माघार घेणार नसल्याचा त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

पहिल्या दिवशी सरकारकडून कोणत्याही प्रकारे मनोज जरांगे पाटील यांच्याशी संपर्क करण्यात आला नव्हता. त्याचबरोबर आझाद मैदानात झालेल्या गैरसोयीवरूनही बरीच सडकून टीका झाल्यानंतर आज सकाळी बीएमसी प्रशासनाकडून आझाद मैदान परिसरामध्ये तातडीने सोयी सुविधा पुरविण्यात आल्या. त्यानंतर दुपारी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक पार पडली. या बैठकीनंतर मंत्री न जाता शिंदे समितीला मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्यासाठी आझाद मैदानात पाठवण्यात आलं. यावेळी समितीकडून आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्याचा आढावा घेत सरकार कोणकोणत्या बाबींवर काम करत आहे याची माहिती देण्याचा प्रयत्न केला.



गणेशोत्सवानिमित्त पनवेल शहर पोलीस ठाणे येथे श्री गणरायाचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, माजी नगरसेविका नीता माळी, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, उमेश इनामदार



दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार व ज्येष्ठ पत्रकार अरविंद पोतदार यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे दर्शन घेताना पोतदार ज्वेलर्सचे मालक अमित अरविंद पोतदार

# अलिबाग–रोहा मार्गावरील पूल कोसळला


## रायगडात प्रशासन झोपेत, जनतेचे जीव धोक्यात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील धोकादायक अवस्थेतील पूल आणि साकवांचा प्रश्न हा नवीन नाही, पण प्रशासनाची बेफिकीरी मात्र दिवसेंदिवस ठळक होत आहे. वर्षानुवर्षे जीव धोक्यात घालणारे हे पूल दुरुस्तीसाठी हंबरडा फोडत होते, मात्र प्रशासनाने कानाडोळा केला. परिणामी शनिवारी सकाळी अलिबाग–रोहा या प्रमुख मार्गावरील पूल–साकव कोसळल्याने मार्ग बंद झाले आणि हजारो नागरिकांना नरकयातना सहन कराव्या लागत आहेत.

या बाबत वृत्तपत्रात अनेक वेळ स्पष्ट इशारा दिला होता की, जिल्ह्यातील अनेक पूल धोकादायक अवस्थेत आहेत. तातडीने दुरुस्ती न केल्यास भीषण अपघात होणारच. पण नेहमीप्रमाणे प्रशासनाने तो इशारा धुडकावून लावला आणि बंदी आदेश देऊन प्रशासनाने हात वर केले होते आज हाच इशारा सत्य ठरून नागरिकांचे हाल सुरु झाले आहेत.

सकाळी सातच्या सुमारास घडलेल्या



या घटनेत सुदैवाने कोणतेही वाहन पुलावर नव्हते म्हणून मोठा अपघात टळला. पण रोज शेकडो दुचाकी व लहान वाहने या मार्गाने जात असतात. आता पूल कोसळल्यामुळे वाहतुकीला ब्रेक लागला असून गावकरी पूर्णपणे अडकले आहेत.

याआधीच रोहा मार्गावरील नवघर व सुडकोली पूल धोकादायक असल्याने वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यातच आता नांगरवाडी परिसरातील हा पूल कोसळल्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. गावकऱ्यांनी संताप व्यक्त करत थेट प्रशासनाला जाब विचारला आहे – आधीच दिलेला इशारा जर प्रशासनाने गंभीरतेने घेतला असता, तर आज आम्हाला या संकटाला सामोरे जावे लागले नसते!

जनतेच्या जीवाशी खेळणारे प्रशासन आधीच बंदी आदेश काढून मोकळे झाले आहे. हीच खरी शोकांतिका आहे. धोकादायक पूल दुरुस्त करण्याऐवजी प्रशासन त्यावर बंदी घालते, आणि नागरिक मात्र हाल सोसतात. तातडीने पूल–दुरुस्ती व पर्यायी व्यवस्था झाली पाहिजे, अन्यथा हा प्रश्न आणखी भीषण होणार आहे. अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

रायगडातील पूल कोसळणे हा अपघात नाही, तर प्रशासनाच्या निष्क्रियतेचा आणि बेफिकीरीचा थेट पुरावा आहे, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते अँड. राकेश पाटील यांनी केला आहे.

सरकार आणि प्रशासन नेहमीच ग्रामीण भागातील पूल आणि साकवांकडे दुर्लक्ष करत आहे. योग्य वेळी लक्ष दिले असते तर पूल तुटला नसता, अशी संतप्त प्रतिक्रिया काँग्रेसचे अँड.कौस्तुभ पुणकर यांनी दिली.

# कर्जतमधून लोकलने मुंबईकडे मराठ्यांसाठी भाकरीचा भारा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी पुन्हा एकदा आपल्या बांधिलकीचे दर्शन घडवले आहे. मराठा आरक्षणासाठी मुंबईत सुरु असलेल्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून कर्जत मधून भाकरीचा ओघ थेट मुंबईकडे रवाना झाला.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका हा मुंबईच्या जवळ असल्याने, गेले अनेक वर्षे कर्जतकर बांधवांनी मराठा लढ्यात सातत्याने आपला सिंहाचा वाटा उचलला आहे. शनिवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी मुंबईत उपासमार होऊ नये या हेतूने कर्जतमधील समाज बांधवांनी भाकरी एकत्रित करण्याचे नियोजन केले.

संध्याकाळी ४.५७ वाजताच्या लोकलने हा भाकरीचा भारा मुंबईकडे रवाना झाला.

दरम्यान, या उपक्रमासाठी समन्वयकांनी सकाळी केलेल्या आवाहनाला कर्जतकरांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला.



अवघ्या काही तासांतच क्यूआर कोडच्या माध्यमातून साधारण लाखभर आर्थिक मदतकाही वेळातच जमा झाली. मदतीचा ओघ अजूनही सुरू असल्याचे समन्वयकांनी सांगितले.

# जेएनपीए – गव्हाणफाटा महामार्गावर अवजड कंटेनर वाहतूक कोंडी

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्यातील मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जेएनपीए बंदरातून हजारोच्या संख्येने अवजड कंटेनर वाहने अडकून पडली होती. जेएनपीए बंदर ते करळ उड्डाणपूलासह द्रोणागिरी औद्योगिक परिसरातील धुतुम, चिर्ले, ते गव्हाणफाटा या दहा किलोमीटर लांबीच्या महामार्गावर अवजड कंटेनर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीमुळे उरण व चिरनेर, कोप्रोली विभागातील जाणारी अनेक प्रवासी वाहने तासंतास अडकून पडली होती. त्यामुळे प्रवाशांचाही खोळंबा झाला होता.

कोसळत्या पावसात सर्वच वाहनचालकांना अडकून राहिल्याने कोणत्याही सुविधापासून खाण्यापिण्याचेही हाल सोसावे लागल्याने चालकही हैराण झाले होते. सदरची वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी उरण वाहतूक पोलिसांचे शर्तीचे प्रयत्न सुरु होते. यामध्ये पनवेल, नवीमुंबई, पुणे व गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या अवजड कंटेनर वाहनांच्या महामार्गावर तीन – तीन रांगा लागल्या होत्या. शर्तीच्या प्रयत्नातून यामधील एक रांग सुरु करण्यात उरण वाहतूक पोलिसांना यश आले.

त्यानंतर काही प्रमाणात वाहतूक सुरु झाल्याची माहिती उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी दिली आहे.

दरम्यान जेएनपीएतील सिंगापूर बंदराच्या वाहतुकीवर परिणाम झाला. करळ उड्डाणपूलावरून मुंबई पुणे व गोवा कोकणाच्या दिशेने जाणारी वाहने अडकून पडली. करळ ते जासई महामार्गही मंदावला. याशिवाय दास्तानफाट्यावरही मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती.



# ३४ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे राज्य सरकारचे सामंजस्य करार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

विविध क्षेत्रातील तब्बल १७ कंपन्यांसोबत तब्बल ३४ हजार कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले. यातून तब्बल ३३ हजार रोजगार उपलब्ध होणार असून उद्योगांना जमीन देण्याची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि पूर्णपणे ऑनलाईन असणारे पोर्टल लवकरच सुरु करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केली.

या गुंतवणुकीत इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, सौरऊर्जा, विद्युत गाड्या आणि ट्रॅक, संरक्षण व त्यासंबंधित विविध क्षेत्रांचा समावेश आहे. उत्तर महाराष्ट्र, पुणे, विदर्भ, कोकण अशा सर्वच भागांमध्ये उद्योग उभारणीची संधी उपलब्ध होणार आहे.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून जवळपास ३४ हजार कोटी रुपयांची



गुंतवणूक राज्यात येत असून जे करार झालेले आहेत त्यातील पाच कंपन्या उत्तर महाराष्ट्रमध्ये, पाच पुण्यात गुंतवणूक करणार आहेत. तर सहा कंपन्या विदर्भात ११ हजार कोटींची गुंतवणूक करणार आहेत. राज्य सरकारच्या उद्योगस्नेही धोरणामुळेच एकीकडे टेरिफ वॉर सुरू असताना देखील महाराष्ट्राला इतक्या मोठ्या प्रमाणात गुंतवणूक मिळणे हा गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर असलेला विश्वास असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात सहज आणि सुरळीत अनुभव मिळावा यासाठी सरकार वचनबद्ध आहे. आम्ही फक्त करार स्वाक्षरीत करून थांबणार नाही, तर गुंतवणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर राज्य शासन भागीदार म्हणून सोबत राहील.

याबाबत कुठेही अडथळा येणार नाही अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या वेळी उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव राजेश कुमार, उद्योग सचिव डॉ. पी. अन्बलगन, औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह आणि विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# आत्मविश्वासाचा सांगावा

आम्ही परस्परांना फार तर सूचना देतो, मात्र मी शाखा चालवण्यात पारंगत आहे आणि भाजप सरकार चालवण्यात...' असा 'प्रॅक्टिकल अप्रोच' व्यक्त करीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संघपरिवारातील संघटनांबद्दल चर्वितचर्वण करणाऱ्यांचे तोंड शिवण्याचे काम नुकतेच केले. हिंदुत्वासोबत तडजोड होणार नाही, हे स्पष्ट करतानाच त्यांनी मुस्लिम तसेच अन्य धर्मीयांसोबत राहायचे असल्याचेही निक्षून सांगितले. त्यांच्या सडेतोड वक्तव्यांनी बदलत्या संघनेतृत्वाची चुणूक दिली. 'धर्म ही वैयक्तिक पसंतीची गोष्ट असली तरी त्यात प्रलोभन किंवा बळजोरी असू नये,' यासारख्या वाक्यांमधून शताब्दीच्या टप्प्यावर संघाची अवस्था किंचितही दोलायमान झाली नसल्याचे प्रत्यंतर त्यांनी दिले. येत्या विजयादशमीला संघाची शतकपूर्ती होईल. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे यंदाच्या नागपूर येथे होणाऱ्या या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे असतील. नवी दिल्लीच्या विज्ञान भवनातील तीन व्याख्यानांनी यंदा त्यापूर्वीच संघाची संभाव्य दिशा पुरेशी स्पष्ट केली. पूर्वीच्या कट्टरवादाच्या तुलनेत संघ बराच लवचीक झाला असल्याची प्रचीती दिल्ली चिंतनाने दिली. पंचाहत्तर वर्षांच्या राजकारण संन्यासाची वयोमर्यादा संघाने आखून दिली नसल्याचा 'इन्ट्रो' त्यातून मिळाला. अनेकांचा त्यामुळे हिरमोड झाला असण्याची शक्यता आहे. 'संघ सांगेल, तेच आम्ही करू' या उत्स्फूर्त उत्तरातून त्यांनी चाणाक्षपणे संघाच्या शीर्षस्थ अधिकारांचे अधोरेखन केले. भाजपसोबत मतभेद असले तरी मनभेद नसल्याची स्पष्टोक्ती सरसंघचालकांच्या बोलण्यात आली.

संघ जाळण्याच्या उद्देशाने आलेल्या जयप्रकाश नारायण यांनी परिवर्तनाची आशा म्हणून संघाकडे बघणे सुरू केल्याचे उदाहरण देत डॉ. भागवत यांनी नागपुरात संघाने राजीव गांधींना साहाय्य केले होते, असा दावा प्रथमच केला. धार्मिक श्रद्धा वेगळ्या असल्या तरी सामाजिक मूल्यांची समानता डॉ. भागवत यांच्या भाषणातून झळकली. मदरसा असो किंवा मिशनरी शाळा; समान शिक्षणाच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. इतर भाषांच्या शिक्षणाचे महत्त्व विदित करतानाच संस्कृतच्या ज्ञानाची सक्ती नको असे म्हणत, इंग्रजीच्या शिक्षणावरील आक्षेप खोडून काढले. त्यांच्या अनेक मुद्द्यांचे स्वागत झाले. प्रत्येक कुटुंबात तीन मुले असण्याच्या त्यांच्या सूचनेला मात्र विरोध सुरू झाला आहे. संघाच्या सहिष्णुतेमुळे अनेकांना सुखद धक्का बसला; मात्र देश विभाजनाच्या प्रतिरोधाचा पुनरुच्चार करीत अखंड भारताचे समर्थन केल्यामुळे संघाने पूर्वीच्या भूमिकेपासून तसूभरही फारकत घेतली नसल्याचे स्पष्ट झाले. 'भारतात इस्लाम राहणार नाही असे मानणारा हिंदू विचारांचाच नाही,' एवढा थेट पवित्रा त्यांनी घेतला. 'मुस्लिमांसह आपल्या लोकांना नोकरी द्या; मात्र घुसखोरांना संधी देऊ नका,' असे ते म्हणाले. दिल्लीचे महाचिंतन आता आटोपले आहे. दोन ऑक्टोबरच्या विजयादशमीचे संघ उद्बोधन होणे आहे. दरम्यान, संघाची तीन दिवसांची अखिल भारतीय समन्वय बैठक पाच सप्टेंबरपासून राजस्थानातील जोधपुरात सुरू होईल. भाजप, अभाविप, विहिंप, रा. से. समिती, भारतीय किसान संघ, विद्याभारती अशा ३२ संस्थांचे पदाधिकारी एकत्र येतील. एरवी लोकचर्चेत न येणारे संघमंथनांचे चक्र असे अव्याहत सुरू असते. संघाने दिलेला भारतीयत्वाचा विचार ही बौद्धिक अभिव्यक्ती असल्याची संघाची धारणा आहे. जनसामान्यांना महत्त्व देणारे बौद्धिक आंदोलन संघाला उभारायचे आहे. भाषक एकत्व किंवा हिंदुत्वाच्या सर्वसमावेशत्वातून ते शक्य असल्याचा विश्वास संघधुरिणांना आहे. आजवरच्या विदेशी दास्यत्वाच्या भावनेतून नागरिकांना बाहेर काढण्याचे कार्य यापुढे वेगाने केले जाईल. दिल्लीच्या विज्ञान भवनातील हे भाषण आणि संवाद हा 'मिशन २०४७' अर्थात भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे नेणारी भक्कम पायवाट आहे. संघस्थापनेपासून अंत:पटलावर कोरलेल्या अनंत वेदना आणि मौन संघर्षाची उजळणी संघशाखांवर तशीही नित्यनेमाने होते. बदलत्या काळानुसार सरसंघचालकांच्या संवादातून त्याचे जाहीर प्रकटीकरण आताशा होऊ लागले आहे एवढेच. दिल्लीतील या त्रिदिवसीय संघचिंतनाचे अनेक अर्थ सांगितले जातील. सरसंघचालकांच्या एका वाक्यातून भविष्यातील पायाभरणीबद्दल संघाचा समर्पणभाव आणि कटिबद्धता स्पष्ट होते. ते म्हणाले, 'आक्रमकांनी केवळ राज्य केले. आपल्याला फक्त देश चालवायचा नाही, तर लोक घडवायचे आहेत. मुलांना भूतकाळाची माहिती मिळायलाच हवी, कारण त्यातूनच स्वाभिमान आणि आत्मविश्वास निर्माण होईल.'

# कंपनी मोठी होण्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्वाचा - लोकनेते रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोणतीही कंपनी मोठी व्हायची असेल तर त्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्वाचा असतो. टीआयपीएल कंपनीमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तो विश्वास सिद्ध करून जीव तोडून काम करतात असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यावेळी काढले.



दानशूर व्यक्तीमत्व असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमीत्त विविधि उपक्रम राबवले जात आहेत. त्यापार्श्वभुमीवर ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमीटेड अर्थात टीआयपीएल कंपनीमधील कर्मचाऱ्यांच्या इयत्ता दहावी आणि बारावी परिक्षेमध्ये उज्वल यश संपादीत केल्या पाल्यांचा सत्कार सोहळा शनिवारी आयोजीत करण्यात आला होता. हा सन्मान सोहळा खांदा कॉलनी मधील सीकेटी महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले कि, आत्ता पासून दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाईल. टीआयपीएलमधील कर्मचाऱ्यांच्या मुलांना पुढील शिक्षणासाठी देखील कंपनी मदत करेल. तसेच टीआयपीएलच्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना देखील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या महाविद्यालयांमध्येही ५० टक्के फी माफी देण्याचे त्यांनी जाहीर केले. या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर आणि टीआयपीएलचे डायरेक्टर अमोघ ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी टीआयपीएलचे डायरेक्टर सीएच भरणीकुमार, एम.पी.त्यागी, अरुण नाईक, जगदीश घरत, शशिकांत मुंबईकर, आनंद लाल, सतीश उगले, दीपक सिन्हा यांच्यासह टीआयपीएलचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आपण जो शब्द देतो तो पाळतो हा विश्वास कंपनीच्या अधिकारी आणि कार्मचाऱ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण केला. तर परेश ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सध्याचे हे स्पर्धेचे युग आहे. जेवढे महत्व परिक्षांमध्ये गुणांना आहे तितकेच महत्वाचे व्यक्तिमत्व विकासही आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी या कौशल्य गुणावर भर द्यावे, असे आव- ाहन केले. या कार्यक्रमात दहावीच्या परिक्षेत कार्तिकी आर्गे, सानीका पाटील, स्वरा खेडकर, दुर्वा कडू, श्रेया घरत, पार्थ मोहिते, वैदेही म्हात्रे, अव्नी लाल, सेजल ठाकूर, युग मोकल, करुण्या गायकर, अनन्या चौहान तसेच बारावीच्या परिक्षेत श्रद्धा श्रीवास्तव, पार्थ सकपाल, गार्गी काले, जय तांडेल, शुभम कोळी, काजल कुमारी व इतर विद्यार्थ्यांचा घवघवीत यश संपादन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# खोपोली नगर परिषदेने दिले ११ सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती आदेश

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषदेत यापूर्वी मयत व निवृत्त झालेल्या तब्बल ११ सफाई कामगारांच्या वारसांना खोपोली नगरपरिषद प्रशासनाने वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती दिलेली आहे. यामुळे या वारसांच्या घरी यंदा गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा होणार आहे.

नोकरीच्या रूपाने गणपतीबाप्पाच पावला अशी भावना नियुक्ती आदेश मिळालेल्या सफाई कामगारांनी व्यक्त केली. यासाठी खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी रणजित पवार, प्रशासकीय अधिकारी सोहन गुरव, लघुटंकलेखक प्रशांत कुलकर्णी व सहायक लखिमले यांनी विशेष मेहनत घेऊन विक्रमी वेळेत कामकाज पूर्ण केले.



# अभंगवाणीच्या सुरांनी निनादला 'पनवेलचा महागणपती'चा दरबार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भक्ती आणि संगीताची मेजवानी यांचा सुवर्ण संगम 'पनवेलचा महागणपती'च्या दरबारात दुसऱ्या दिवशी अनुभवायला मिळाला. श्री वेद मनू निर्मित अभंगवाणी मंडळाने सादर केलेल्या भजन सेवेने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. गायक मनोज पाटील यांच्या मधुर आवाजात आणि हार्मोनियम, तबला व पखवाजाच्या सुरेल साथीने गणेशभक्त मंत्रमुग्ध झाले.



भजन सेवेला प्रारंभ होताच वा- तावरणात भक्तीची लहर पसरली. 'जय हरा शिवशंकरा' या भजनाने सेवेची सुरुवात झाली. त्यानंतर 'रूप पाहता लोचणी', 'गणराया लवकर येई', 'देव घरा आला' अशा मंत्रमुग्ध करणाऱ्या गीतांनी गणेशभक्तांच्या हृदयात भावनांचा उधाण आणले.

गायक मनोज पाटील यांनी आपल्या रसाळ आवाजाने प्रत्येक पद्याला जिवंत केले. हार्मोनियमवर श्रीधर काकडे, तबल्यावर वेदांत पाटील आणि पखव- ाजावर परेश पाटील यांनी अप्रतिम साथ देत संगीतसेवेला अभंगतेची, अखंडतेची छटा दिली.

'यमुनेच्या तीरी', 'लहानपण देगा देवा', 'माझे माहेर पंढरी', 'ध्यान लागले रामाचे', 'काया ही पंढरी' यांसारख्या संतवाणीने गणेश भक्तांना वारकरी परंपरेचा स्पर्श घडवला.

विशेषत: 'कांदा मुळा भाजी, अवघी विठाबाई माझी' या अभंगाने वातावरण भारावून टाकले. पंढरीच्या वैष्णव संप्रदायाची गोडी आणि वारकरी परंपरेतील सहजता यातून प्रकट झाली.

पनवेलच्या महागणपतीच्या चरणी हा सुरेल उत्सव घडत असल्याने गणेशभक्तांना केवळ ऐकण्याचा आनंदच नाही तर अध्यात्मिक उन्नतीची अनुभूतीही मिळाली.

पनवेलचा महागणपती हा केवळ ऐश्वर्य आणि सजावटीसाठी ओळखला जात नाही, तर येथे वर्षानुवर्षे समाजोपयोगी उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि अध्यात्मिक सेवा आयोजित केल्या जातात. या गणेशोत्सवात प्रत्येक दिवशी काही ना काही विशेष धार्मिक, सांस्कृतिक किंवा समाजजागृतीचे कार्यक्रम राबवले जातात.

दुसऱ्या दिवशी आयोजित केलेली ही भजन सेवा हे त्याचेच एक सुंदर उदाहरण आहे. या सेवेने पनवेलच्या महागणपती मंडळाच्या सांस्कृतिक परंपरेला आणि भक्तिरसिक श्रोत्यांना नवी ऊर्जा दिली.

# पोलादपूरच्या चोळई बुरूडवस्तीत विणलेल्या सुपांमधून आज हजारो माहेरवाशिणी सुहासिनींचा 'ओवसा'

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गौरीचे वाण सूप ही एक कोकणातील पारंपरिक प्रथा आहे, ज्यामध्ये गणेशोत्सवाच्या काळात गौरीची पूजा करताना सुवासिनी (सवाष्ण स्त्रिया) गौरीसमोर भरलेले सूप ठेवून ओवाळतात. नव्याने लग्न झालेल्या मुलीसाठी हे व्रत विशेष महत्त्वाचे मानले जाते. नवीन लग्न झालेली मुलगी आपल्या माहेरच्या गौरीला आणि मग सासरच्या गौरीला सूप ओवाळते. सोशल मिडीयाच्या जमान्यात 'सुपली सोन्याची गं सुपली सोन्याची...'या गाण्यावरील रिल्सने धुमाळूळ घातला आहे. मात्र, पोलादपूर तालुक्यातील चोळई बुरूडवस्तीतील विणलेल्या सुपांमधून आज हजारो माहेरवाशिणी सुहासिनींचा 'ओवसा' पूजला जाणार आहे.

घरातील सुवासिनी गौरीची पूजा करतात आणि हळदी-कुंकू लावतात. गौरीसमोर दोन हातांनी भरलेले सूप ठेवले जाते. गौरीला नमस्कार करून सूप खाली ओढले जाते, या प्रक्रियेला 'वोवसणे' असे म्हणतात. यात सूपात पैसे आणि इतर वस्तू ठेवून गौरीच्या चरणी ठेवले जाते आणि गौरीला नमस्कार करून इच्छा सांगितल्या जातात. ओवाळलेल्या सुवासिनींना खणानारळाने ओटी भरली जाते आणि त्यांचा मान-सन्मान केला जातो. ही प्रथा कोकणातील एका लोकप्रिय परंपरेचा भाग आहे. या परंपरेसाठी आवश्यक वस्तू म्हणजे गौरीचे वाण असलेले सूप जे विणण्याची प्रथा कालबाहय होऊ लागली आहे. मात्र, पोलादपूरलगतच्या चोळई गावातील बुरूड समाजाच्या लोकवस्तीमध्ये आजही ही सूप जे विणण्याची सामाजिक परंपरा कायम ठेवली आहे.

बांबू लागवड करण्यासाठी कोकणात गेल्या काही वर्षांपासून उदासिनता असल्याने बुरूड समाजाच्या या व्यवसायाला कच्च्या मालाची कमतरता भासत होती. गौराईच्या वाणासाठी सूप, डालगे, टोपल्या, कणग्या तसेच अन्य बांबूपासून बनविण्यात आलेल्या बुरूड समाजाच्या परंपरागत हस्तकला कौशल्याच्या वस्तूंची जागा प्लास्टीक आणि फायबरच तकलादू आणि महागडया वस्तूंनी घेतली. मात्र, अशा परिस्थितीतही पोलादपूर तालुक्यातील सडवली ग्रुपग्रामपंचायत सडवली अंतर्गत चोळई गावातील बुरूडवस्तीमध्ये योगिता एकनाथ गायकवाड या महिलेने माहेरापासून जोपासलेली बुरूड कामाची परंपरा नेटाने सासरीदेखील सुरू ठेवली. बांबूपासून सूप विणताना योगिता गायकवाड यांनी आधीपासूनच बांबूच्या पट्टयांना रंग देऊन आकर्षकपणा आणण्याचे कसब दाखवून सुपांचा आकर्षकपणा अधिकच खुलविला आहे. यामुळे या सुपांचे आकर्षण नवविवाहितेच्या माहेरी तसेच सासरीदेखील वाखणले जात असून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातील पहिले गांव असलेल्या चोळईमध्ये हस्तकला केंद्र निर्माण झाल्यास या सुपांना अधिकच मागणी वाढेल, असा विश्वास योगिता गायकवाड यांना वाटत आहे.





छायाचित्रकार शंतनु रविंद्र कुवेसकर यांचे निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज



कु. मेहुल सुनिल गोवारी, रा. कामोठे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराय



चिपळूण - धामेली खेडेकर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज



मधुकर गोपीनाथ रिकामे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराय

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि, आमचे आशील श्री. दलजित सिंग S/O उदम सिंग सैनी राहणार हाउस - १९४९, शिव कॉलोनी, प्लॉट ९७, सेक्टर-०१, ऐरोली नवी मुंबई, यांना मौजे- कळंबोली, नवी मुंबई तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे व्यावसायिक भूखंड खरेदी करण्याचा विचार केला असता, आमच्या आशीलानी, श्री. मंगल सिंग रंधावा S/O अजित सिंग रंधावा, यांच्या मालकीची खालील मिळकत खरेदी करण्याची तयारी दर्शवली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

प्लॉट नं. १७१९, रोड नं. २१, स्टील वेअर हौसिंग कॉम्प्लेक्स (KWC), मौजे- कळंबोली, नवी मुंबई, तालुका- पनवेल, जिल्हा- रायगड, एकूण क्षेत्रफळ = २५० चौ. मी

या संपूर्ण मिळकतीचे (या पुढे ''सदर मिळकत'' असा उल्लेख केला जाईल)

सदर मिळकत घेण्याची तयारी दर्शवली आहे. त्या नुसार उभय दोन्ही पक्षकारामध्ये तसा करार करण्यात आला आहे.

त्यामुळे सदर मिळकतच्या आमच्या अशिलांच्या नावे हस्तांतर करण्या अगोदर, सदर मिळकतचे मालक यांनी, सदर मिळकतबाबत हस्तांतरण, देवाण-घेवाण, गहाण विश्वस्त संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, साठेखत, सामंजस्य करार, बक्षीस, मृत्य पत्र, वाटप पत्र, व इतर कोणत्याही स्वरूपाचा करार असल्यास अगर कोण्याही स्वरूपाचा हित संबंध असल्यास, त्याचा पृष्ठयार्थ सर्व कागद, दस्त ऐवज पुराव्या सह खालील मिळकतीचे वर्णन कार्यलयींन पत्त्यावर व कार्यलयीन वेळेत सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत सुचित करणे आवश्यक आहे. जर अशा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर, सदर मिळकतवर कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही. अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असा समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरचा मिळकत बाबत कोणाचीही व कसलीही हरकत आल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशील सदर मिळकत खरेदी घेऊ शकतात. कायदेशीर बाबींची पूर्ण पूर्तता करून आमचे अशील सदर मिळकत चे मालक होतील याची नोंद घ्यावी.

दि.३०/०८/२०२५

सही/-

**ॲड.सर्जिल बी. शेख**

**शॉप नं.१४, शुभ शरणम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२१, सेक्टर-१५, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**

**मो.नं.९२२३५५२८८८ ऑफिस : ९२२१२८१४१४**

मा.पवार मॅडम यांचे कोर्टात

वादीतर्फे वकील : ॲड.शेखर खोपकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश व-स्तर यांचे न्यायालयांत

स्पे.द.क्र.५०/२०१७

नि.नं.२६/ड

ने.ता.०३/०९/२०२५

श्री मियाँ अब्दुल लतिफ पटेल वगैरे — द. वादी

विरूध्द

श्रीमती अमिना युनुस पटेल वगैरे — द. प्रतिवाद

प्रति,

द. प्रतिवादी क्रं. २/७. श्रीमती सबीना सलमान अधिकारी,

रा. कच्छी मोहल्ला, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड

ज्याअर्थी द.वादी यांनी तुमच्या विरूद्ध या न्यायालयांत दरखास्त दाखल केलेली आहे, म्हणून सदर दरखास्तीच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्याकरीता दिनांक ०३/०९/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यांस यथायोग्य सुचना दिलेल्या असून ज्या दरखास्त वादासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा किंवा सर्व प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा व्यक्ती त्यांच्या बरोबर असेल, अशा वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलवण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरवलेला दिवस दरखास्तीचे अंतीम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे बचावाच्या पृष्ठयर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीच्या व ज्या दस्तऐवजाचा आधार घेवू इच्छीता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या त्या दिवस हजर करण्याची तयारी तुम्हाला ठेवावी लागेल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहील्यास तुमच्या गैरहजेरीत दरखास्तीची सुनावणी होवून निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पुर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा जबाब रद्द करण्यांस पात्र ठरेल.

आज दि.२९/०८/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत माझे अशिलांने खरेदीखत करून प्रस्ताविक जमीन मालक श्री रमाकांत पुंडलीक पाटील व इतर २७ खातेदार या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर वर्णीत जमीन मिळकत ही श्री. रमाकांत पुंडलीक पाटील व इतर २७ खातेदार यांच्या प्रत्यक्ष वहीवाटीत व ताबे कब्जात आहे. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : बोर्ले, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| बोर्ले | ५४/१ | ०-२९-१०<br>पो.ख. ०-०१-७०<br>एकूण ०-३०-८० | ६.३१ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार - मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व वोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

दि.३०/०८/२०२५

सही/-

**ॲड.श्री.महेंद्र अनंता पाटील**

**डी/३/१, किनारा हौ.सोसा., बावन बंगला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

**मो.नं.९८२०७९५६०५**

# मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

धनंजय पांढरकर यांनी त्यांची १५ हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची निळ्या रंगाची डिस्कवर मोटारसायकल क्रमांक एमएच ०२ बीई २२१६ हि पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

## जाहीर नोटीस

याव्दारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. संभाजी बाळाराम गॉधळी, पत्ता- घोटगांव तळोजा, एम आय डी सी रोड, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांचा मुलगा कु. आरूष संभाजी गोंधळी जन्माची नोंद ठाणे महानगरपालिका यांचे अभिलेखात केली नसल्याने कु. आरूष संभाजी गोंधळी जन्माची नोंद करणेकामी ठाणे महानगरपालिका यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि.११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करुन जन्म मृत्यूच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ कलम २३(२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कु. आरूष संभाजी गोंधळी यांचे जन्माची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारीत करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वतः अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र. महसूल/कक्ष-१/ह. नोंद-१/टे-३/कावि-७५७७/२४

तहसीलदार कार्यालय, ठाणे

दिनांक:- १६/०७/२०२५

सही/-

**(उमेश पाटील)**

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीस ने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका- माणगाव हद्दीतील खालील वर्णित मौजे उतेखोल येथील मिळकत ही आमच्या अशिलांनी श्री. सुरेश रामा कवडे यांचे कायदेशीर अखत्यारी श्री. बदरीनाथ एम. जी. यांच्या मिळकतीपूर्ती मर्यादित कायम खुशखरेदी खताने विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:

| अनु. क्र. | गाव | इमारतीचे नाव | सदनिका क्रं. | बिल्टअप क्षेत्र चौ.फुट | मजला |
|---|---|---|---|---|---|
| १ | उतेखोल | वंदना अपार्टमेंट | २०१ | ७२० चौ.फुट | दुसरा |

सदर व्यवहारास उल्लेखित सदनिकेचे विद्यमान मालकानी संमती दर्शवली असून आमचे अशिलांनी सदर खरेदी व्यवहार पूर्ण करण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही मालकी हक्क, वारस, हिस्सेदार, ताबेकब्जा, विसर पावती, करारनामा, गहाणखत, साठेखत, अखत्यारपत्र, खरेदीखत, वाटपपत्र, वचनचिठ्ठी, मृत्युपत्र, भाडेकरार, बक्षीसपत्र, दान, तारण, लिज, पोटगी, चार्ज, लिन संपादन, जप्ती, दावा, कुळ वहिवाट ट्रस्ट, भाडेकरार, इजमेंट फरोक्त, पोटगीचा अधिकार, अशा व इतर कोणत्याही कायदेशीर अधिकारान्वये हरकत असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात दिवसांमध्ये लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील दिलेल्या पत्त्यावर लेखी हरकत घ्यावी, अन्यथा सदर व्यवहारास कोणाचीही कमानीही कायदेशीर हरकत नाही असे गृहीत धरून आमचे अशील हा सदर व्यवहार पूर्ण करतील व उशिरा आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची तमाम जनतेने कृपया नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदर जाहीर नोटीस ही जनहितार्थात असून जनतेची तसेच आमचे अशिलांची कोणतीही फसवणूक होऊ नये या उद्देशाने देण्यात आलेली आहे.

माणगाव

दि.३०/०८/२०२५

सही/-

**ॲड.किशोरी सिताराम मानकर**

**फ्लॅट क्रं.१२, पहिला मजला, गणेश आंगण, सिद्धी नगर, मोर्बा रोड, माणगाव, रायगड-४०२१०४**

**संपर्क : ९६३७८९१२२९**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत धर्मा रघुनाथ म्हात्रे व इतर यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे पिरकोन, येथील मिळकत भूमापन नं. १९५/५ यांसी क्षेत्र ०.३८.०० हे. आर. प्र., पोटखराबा ०.०२.०० हे. आर. प्र. यांसी आकार रक्कम रुपये ५.१२ पैसे, यांसी चतु:सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : ३१ ऑगस्ट २०२५.

सही/-

**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**

**खरेदीदारा तर्फे वकिल, ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**

**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**

# गाव विकासाचे 'शेलघर' मॉडेल महाराष्ट्राला आदर्शवत : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उलवे**

राजकीय इच्छाशक्ती असेल तर गावाचा विकास शहरांपेक्षा सुंदर होऊ शकतो. 'एकविसाव्या शतकातील सुनियोजित शहर' अशी बिरुदावली मिरविणाऱ्या सिडकोच्या विकसित, विकसनशील नोडची अवस्था आजघडीला 'नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा' याप्रमाणे झाली आहे. पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई, रस्त्यांची दुरावस्था, उघडी गटारे, बेकायदा आठवडा बाजारातील दुर्गंधी, अशा अवस्थेत असणारे उलवे नोडच्या कुशीत 'शेलघर एक टुमदार गाव' आहे. त्याचा विकास गेल्या १५ वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर सुंदर आणि विकसित शेलघर गाव असा प्रवास कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी करून सर्वपक्षीय खासदार, आमदार, राजकारण्यांच्या डोळ्यांत शेलघर विकासाचे मॉडेल उभे करून झणझणीत अंजन घातलेले आहे. शुक्रवारी (ता.२९) शेलघरमधील ४००० स्के. फुटांच्या वातानुकूलित मोफत व्यायामशाळेच्या सातव्या वर्धापनदिन झाला. यावेळी

महेंद्रशेठ घरत यांनी सुंदर, टुमदार बंगल्यांचे गाव अशी त्याची नवी ओळख आहे त्या शेलघर गावाच्या विकासाचे रहस्य उलगडले. गावातील युवक-युवतींसाठी मोफत व्यायामशाळा, गावातील लग्न कार्य, डोहाळे जेवण, वाढदिवस साजरे करण्यासाठी आलिशान अशा 'जोमा नारायण घरत' वातानुकूलित समाज मंदिराची उभारणी, युवकांसाठी सुसज्ज खेळाचे मैदान, जलकुंभ, अंतर्गत गटारे, सीसीटीव्ही, हायमास्ट, स्ट्रीट लाईट, भव्यदिव्य साई मंदिराची उभारणी अंतिम टप्प्यात अशाप्रकारे रचनात्मक विकासाचे मॉडेल 'माझं गाव आणि मी गावासाठी' केले आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यपातळीवर काम करीत असताना 'घार हिंडे आकाशी, मात्र तिची नजर आपल्या पिल्लांपाशी', तसेच 'महेंद्रशेठ फिरतो जगभर, मात्र लक्ष आपल्या गावावर' अशा आत्मियतेने शेलघर विकासाचे मॉडेल उभे करून आज अभिमानास्पद कामगिरी केली आहे.



## गाळा विकणे आहे

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**

## वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## जाहीर नोटीस

या तमाम जनतेस कळविण्यात येते आमचे अशिल चिंतामणी नेक्स्टजेन डेव्हलपर्स तर्फे भागिदार १) श्री राहुल देव मिश्रा २) श्री विश्वास धीर ३) सौ आशा सुधीर पारकळे ऑफिस पत्ताः ३०६, फाउंडेशन टॉवर, से-११, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई हे खालिल वर्णानाची मिळकत श्री. कमलाकर नामा पाटील यांचे कडुन कायमस्वरुपी विकत घेत आहेत. आणी त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे हस्तांतरीत करुन घेत आहेत. सदर मिळकत ही श्री. कमलाकर नामा पाटील यांच्या मालकीची व वहिवाटीची असलेल्या संपादित जमिनीपोटी सिडको महामंडळाकडुन मिळाली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | भूखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| मौजे : पुष्पक (वहाळ), ता.पनवेल, जि.रायगड | २८१ | २६ | १२०.०० चौ.मी. |

तरी सदर भुखंडा बाबत, कोणाचाही कोणत्याही भागावर, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरू हक्क, साठे करार, मुखत्यारपत्र, सामंजस्य करार किंवा यासारखे कोणतेही दावे, मालकी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे योग्य हितसंबंध असल्यास, उक्त व्यक्ती किंवा संबंधित ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क हितसंबध असल्यास कागदोपत्री पुराव्यासह खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येऊन भेटावे. वरील विहित कालावधीत कोणाचाही आक्षेप किंवा तक्रार नसल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क, हितसंबध नाही असे समजुन आमचे अशिल सदर भुखंडाचा व्यवहार पुर्ण कर्ती व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडुन दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकानी नोंद घ्यावी.

दि.३०/०८/२०२५

सही/-

**ॲड.रेखा किशोर होवाळे**

**ऑफिस नं.१३, प्रभात सेंटर, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**

**मो.नं.८३६९०१७३६३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसाव्दारे कळविण्यांत येते की, मौजे-डेरवली, ता.पनवेल, जि. रायगड येथील महसुल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे आशिलांनी या जमिनीचे मालक आंबो बाळाराम पाटील, वंदना एकनाथ शेळके, लक्ष्मी माया कातकरी, शेवंता संजय पाटील, अलंकार धनाजी पाटील, चित्रा मनोज शिनारे, धनश्री धनाजी पाटील यांचे कडून सदरहू मिळकत कायम खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| भोगवटदार | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वर्ग १ | ९६/१ | ०-३०-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-३१-०० | ४.२० |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विकी, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी रस्ता, पाणी येण्या-जाण्याचा रस्ता अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क व हीतसंबंध असल्यास कींवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहरास हरकत असल्यास त्यासंबधाची व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत पूराव्यासह लेखी कागदपत्रांच्या स्वरुपात स्वतःहून हजर होउन आमचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत कळवावे. वरील मुदतीत कोणीही कसलीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हीतसंबध नाही असे समजण्यात येईल. किंवा तसे असल्यास तो हक्क व हीतसंबध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिला असून त्याची आमच्या आशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती हरकत आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.३०/०८/२०२५

स्थळ : पनवेल

सही/-

**ॲड.योगेश नामदेव म्हात्रे**

**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**

**मो.नं.८०९७१०८०६०**

## जाहीर नोटीस

सदर नोटीस द्वारे तमाम जनतेस कळविन्यात येते कि, आमचे अशिल श्री. प्रदिप्ता कुमार हरिचरण सेनापती पत्ता: प्लॉट-बी/२०२, भुखंड क्र. १९१, सेक्टर-२०, उलवे २) श्री.अंकित हलवाई राहणार- ए-७०४, सिध्दीविनायक युथोपिया, से-२०, प्लॉट नं १९१, उलवे जिल्हा-रायगड, हे खालील वर्णनाचा भुखंड १) श्री दिनेश काशीनाथ तेलंगे २) किरण काशीनाथ तेलंगे यांचे कडून विकत घेउन हस्तांतरीत त्रिपक्षीय करारनाम्या द्वारे करुन घेत आहे. सदर भुखंड हा १) श्री दिनेश काशीनाथ तेलंगे २) किरण काशीनाथ तेलंगे याना सिडको कडुन त्यांच्या संपादित घरापोटी मिळालेली आहे.

**मिळकतीचे वर्णनः- मौजे : पुष्पक तालुका : पनवेल जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक | २५ ए | ३२ सी | १३० चौ.मी. |

तरी याबाबत जर कोणाची हरकत दान, गहाण, बक्षीस, कोर्ट प्रलंबित केस, खरेदी विक्री करार इत्यादी असे असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाले पासुन १५ दिवसात खाली नमुद पत्यावर आपली हरकत नोंदवावी. उशिरा येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोद घ्यावी.

दि.३०/०८/२०२५

बेलापूर

सही/-

**ॲड.रेखा किशोर होवाळे**

**ऑफिस नं.१३, प्रभात सेंटर, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**

राठोड साहेब कोर्ट

ॲड.अजित धनराज म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१५५७/२०२४

नि.नं.१०/ड

ने.ता.२५/०९/२०२५

श्री. शंकर भु-या पिंगळे

वय ३९, धंदा नोकरी,

रा. ३९४ अ, कोल्ही कोपर,

पो. पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याआर्थी अर्जदार हे कृष्णाबाई भुऱ्या पिंगळे उर्फ किसनाबाई बाबू पिंगळे यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार यांची आई कृष्णाबाई भुऱ्या पिंगळे उर्फ किसनाबाई बाबू पिंगळे हे दिनांक २९/१२/२०२३ रोजी मौजेः- वडघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, येथे मयत झाले आहेत.

अर्जदार हेच कृष्णाबाई भुऱ्या पिंगळे उर्फ किसनाबाई बाबू पिंगळे यांचे वारसदार आहेत तसेच अर्जदार यांच्याशिवाय कै. कृष्णाबाई भुऱ्या पिंगळे यांस आणखी कोणीही वारसदार नाहीत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| ओवळे-२०३+२५७ | ६३ | १ अे | ०-१४-० |
| | ७१ | २+३+४+५+७+सी | ०-१३-७ |
| | ७४ | ४ | ०-०१-० |
| ओवळे- २२८+२४०+२७१ | ४० | १२ | ०-०७-० |
| | ६३ | १ बी | ०-०७-० |
| | ७४ | १ | ०-००-५ |

सदरच्या मिळकती हया नवीन मुंबई प्रकल्पाकरीता सिडकोने संपादित केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा कृष्णाबाई भु-या पिंगळे उर्फ किसनाबाई बाबू पिंगळे यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे. सदर मिळकतीच्या मोबदल्यात खालीलप्रमाणे भुखंड वाटप करण्यात आलेले आहे.

| मौजे | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर वडघर | ८ | २७ | ४६० |
| पुष्पकनगर वडघर | ६१ | ६ | १८० |

कृष्णाबाई भुऱ्या पिंगळे उर्फ किसनाबाई बाबू पिंगळे यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि. चौ. अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या. वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कृष्णाबाई भुऱ्या पिंगळे उर्फ किसनाबाई बाबू पिंगळे यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तकार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख १९/०८/२०२५ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# निवडणूक खर्चाचा तपशील सादर न करणाऱ्या ग्रामपंचायत उमेदवारांना अपात्र करण्यास जिल्हाधिकारी प्रशासनाची दिरंगाई

**दै.रायगड नगरी । तळा**

भारतीय लोकशाहीचा पाया मजबूत करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व असणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत शासनाने निर्देशित केलेल्या नियमांचे उल्लंघन केल्याच्या अनेक घटना राज्यभरात उघडकीस येत आहेत. विहित मुदतीत खर्चाचा तपशील सादर न केल्याप्रकरणी तळा तालुक्यातील गिरणे, तळेगाव,निगुडशेत,चरईखुर्द या ग्रामपंचायतीतील उमेदवारांना अपात्र करण्यात यावे याबाबतीत तक्रारी अर्ज खेळू वाजे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास ऑगस्ट २०२३ रोजी केला होता.नियमानुसार ६ महिन्यात याचा निकाल देणे अपेक्षित होते परंतु आजतागायत याचा निकाल अजून जिल्हाधिकारी प्रशासनाने दिलेला नाही या गोष्टीला दोन वर्षाचा कालावधी लोटून गेला आहे जिल्हाधिकारी प्रशासन याबाबतीत दिरंगाई का करत आहे ? त्यांच्यावर कोणाचा दबाव आहे का? असे अनेक प्रश्न आता निर्माण झाले आहेत.

तळा तहसील कार्यालयाकडून दिलेल्या माहिती नुसार गिरणे, तळेगाव,निगुडशेत,चरईखुर्द या ग्रामपंचायतीतील एकूण २३ ग्रामपंचायत उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा तपशील सादर केलेला नाही.प्रचार व प्रसारावरील खर्चाचा तपशील निवडणूक काळात दर दोन दिवसांनी निवडणूक अधिकाऱ्याकडे लेखी स्वरूपात सादर करणे बंधनकारक आहे, तर निवडणूक संपल्यानंतर महिनाभरात संपूर्ण खर्चाचा तपशील देणे सक्तीचे असते.

खर्च सादर न करणाऱ्यांना सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याची कायद्यात तरतूद आहे.महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ वे कलम १४ ख १ अन्वये त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे.

खेळू वाजे यांनी या उमेदवारांना अपात्र करण्यात यावे असा लेखी अर्ज केला आहे या अर्जाची दखल घेऊन जिल्हाधिकारी प्रशासनाने चार हिरिंग घेतल्या आज दोन वर्षे पूर्ण होण्यास आली तरीही अजून निवडणूक खर्च जमा न करणाऱ्या उमेदवारांना अपात्र केलेले नाही.

खर्चाचा अहवाल सादर न केलेल्या उमेदवारांना अपात्र करण्यात जिल्हाधिकारी कार्यवाही करत नसल्याने राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे याबाबतीत दि.३.७.२४ रोजी लेखी तक्रार करण्यात आली होती त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोग उपायुक्त राजेंद्र पाटील यांनी खर्चाचा अहवाल सादर न केलेल्या उमेदवारांना अर्नह करण्यात विलंब लावण्यात येत असल्याबाबतीत पत्र व्यवहार केला असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने यापूर्वी ३.७.२५ रोजी सन २०२३ मध्ये निवडून आलेल्या उमेदवारांनी खर्च सादर न केलेल्या उमेदवारांना अर्नह करण्याची कारवाई जिल्हाधिकारी स्तरावर करून आयोगास अवगत करावे असे आदेश दिले मात्र या आदेशाला केराची टोपली दाखवत जिल्हाधिकारी प्रशासनाने उमेदवारांना अपात्र करणे संदर्भात असमर्थता व्यक्त केली आहे.हि अतिशय गंभीर व असंविधानिक बाब असून याप्रकरणी योग्य कार्यवाही आणि कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

निवडणूक विभागातर्फे सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी ही राष्ट्रीय कर्तव्याचा भाग आहे.याबाबत निवडणूक विभागामार्फत स्वयंस्पष्ट आदेश निर्गमित केले आहेत. कोणाच्या दबावाखाली आपली जबाबदारी टाळण्यासाठी कोणीही आदेश रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास अथवा विलंब केल्यास नियमानुसार कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# उगवत कोंड उंदेरी चोरगेवाडी उबाठा मधून उपसरपंचासह शिवसेनेत दाखल



**दै.रायगड नगरी । महाड**

विन्हेरे विभागातील उंदेरी चोरगेवाडी येथील उभाठा पक्षातील कार्यकर्त्यांनी नामदार मंत्री भरत शेठ गोगावले यांच्या नेतृत्वाखाली उपसरपंच सह केला शिवसेनेत जाहीर प्रवेश प्रवेश कर्ते_प्रकाश पवार उपसरपंच उंदेरी ,सुधाकर चोरगे, नामदेव बुरटे, अनंत कालप,चंद्रकांत कालप ,गोविंद महाले, रमेश चोरगे, विठोबा बुरटे ,अरविंद महाले, सचिन चोरगे इत्यादी केला शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्ष प्रवेश समारंभ वेळी उपस्थित माजी जिल्हा परिषद सदस्य निलेश ताठरे, किशोर शेठ, नितेश कदम, बाळाराम खेडेकर, रोहित आखाडे, अनिल काते उपसरपंच दत्ताराम खळे, कृष्णा गायकवाड, दिलीप गायकवाड, यांच्यासह या विभागातील शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# पेण तर्फे तळे ग्रामस्थांचा ना.भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेनेत पक्ष प्रवेश



**दै.रायगड नगरी । वावेदिवाळी इंदापूर**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ माण–गाव तालुक्यात शिवसेना पक्षात जोरदार इनकमिंग सुरूच आहे. विवीध पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ना.भरतशेठ गोगावले यांची कार्यप्रणाली पाहून शिवसेना पक्षात प्रवेश करीत आहेत. पेण तर्फे तळे येथील ग्रामस्थांनी दि. २९, ऑगस्ट रोजी ना. भरतशेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षात प्रवेश केला.

यावेळी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक ज्ञानदेव पोवार, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर आदी उपस्थित होते. यावेळी अरुण पेणकर, राम वडेकर, विकास मोंडे, दत्ताराम पेणकर, अनंत वडेकर, धोंडू आरसे, उमाजी ताम्हणकर, चंद्रकांत पेणकर, सुरेश पेणकर, मोहन पेणकर, संदिप पेणकर, सुभाष पेणकर, अनिल पेणकर, राजेंद्र पेणकर, सिताराम पेणकर, नरेंद्र पेणकर, सुनील पेणकर, गणेश पेणकर, पांडुरंग पेणकर, रोहन पेणकर, राजू पेणकर, राजे वडेकर, जानु वडेकर, शैलेश वडेकर, यशु पेणकर, आर्यन पेणकर, गणेश पेणकर यांच्या सह शेकडो पेण तर्फे तळे ग्रामस्थांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला.

आगामी येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकींच्या दृष्टीने पेण तर्फे तळे ग्रामस्थांचा पक्ष प्रवेश महत्वाचा ठरणार आहे. तळाशेत जिल्हा परिषद गणात शिवसेना पक्ष पूर्ण ताकदीने निवडणूक लढवेल व जिंकेल ही. ना. भरतशेठ गोगा–वले यांच्या माध्यमातून अनेक विकासकामे जलदगतीने होत आहेत. त्यामुळे शिवसेना पक्षावर जनतेचा विश्वास वाढला आहे, असे यावेळी तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर यांनी सांगितले.

# मुंबई उपनगर जिल्ह्यात अद्यावत क्रीडा संकुल विकसित करणार : ना.आशिष शेलार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आजच्या युगात अभ्यासासोबत खेळाचे महत्त्व आहे. शासनाकडून आवश्यक ती सर्व मदत खेळाडूंना देण्यात येत आहे. याशिवाय मुंबई उपनगर जिल्ह्यात या वर्षांमध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाअंतर्गत एक अद्यावत क्रीडा संकुल विकसित करण्यात येत असून यामध्ये विविध प्रकारांच्या क्रीडा सुविधा उपलब्ध असतील असे मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागा अंतर्गत असणाऱ्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर द्वारा मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनाच्या निमित्त २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रम उत्तर भारतीय संस्था हॉल, बांद्रा पूर्व येथे करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री ड. आशिष शेलार होते. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ काटियार,एन स्वामी रंगास्वामी (समर ऑलिंपिक खेळाडू) आंतरराष्ट्रीय वेट लिफ्टिंग खेळाडू, श्री. विपुल घोष (द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित)उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विविध क्रीडा क्षेत्रामध्ये प्रविण्य प्राप्त खेळाडूंचे मुंबई उपनगर जिल्ह्याचा नावलौकिक वाढविल्याबद्दल विशेष आभार मानले. या कार्यक्रमामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यातील विविध खेळातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू, छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी अशा ११ पुरुष आणि महिला खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. तसेच पारंपरिक खेळाचा वारसा असलेल्या दहीहंडी खेळाच्या पथकांचे पार्ले स्पोर्ट्स या महिला गोविंदा पथक (सात थरांचा विश्व विक्रम) कोकण नगर गोविंदा पथक आणि जय जवान गोविंदा पथक (दहा थरांचा विश्व विक्रम ) यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी योगा आणि दहीहंडी या खेळांची प्रत्यक्षिके सादर करण्यात आली.

जिल्हयातील क्रीडा यशाबाबत आणि विविध उपक्रमबाबतची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली. प्रस्तावना जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती रश्मी आंबेडकर यांनी केली. कार्यक्रमासाठी खेळाडू उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यलयाने विशेष प्रयत्न केले.




# मुरुड–काशिद बीचवर शुकशुकाट



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड जंजिरा पर्यटनात ऑगस्ट अखेरच्या विकेंड ला शनिवारी मुरुड–काशिद बीचवर तुरळक प्रमाणात तर काही ठिकाणी शुकशुकाट दिसून येत होता.

मुरुड–काशिद बीचवर पर्यटकांची मागील विकेंडला गर्दी पाहावयास मिळाली होती.गौरी गणपती सणांच्या पार्श्वभूमीवर मुरुड आजुबाजूच्या परिसरात कोकणवासीयांचा सणात उत्साह दिसून येत आहे.गेल्या आठवड्यापासून अधूनमधून तर काही वेळा जोरदार वा–यासह पढणा–या पावसाचा परिणाम पर्यावरणावर दिसून येत असून काही ठिकाणी शुकशुकाट दिसून येत होता.

पर्यटनात पुणे, सांगली, सातारा, कराड, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक, नागपूर, धुळे यवतमाळ अशा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून तसेच महाराष्ट्राच्या बाहेरून व देश विदेशातून पर्यटक मुरुडला भेट देत असतात.

मुरुड समुद्रकिनाऱ्यावरील रुपेरी वाळू, निळाशार समुद्र, समुद्रामध्ये मध्यभागी असलेला पद्मदुर्ग, मुरुडला असणाऱ्या नारळी पोफळीच्या बागा यामुळे पर्यटक मुरुड कडे आकर्षित होत आहे.

काशीद बीचवर असणारी रुपेरी वाळू, उंच उंच सुरुची झाडे त्यामुळे पर्यटक काशीद बीचला ही मोठ्या प्रमाणात भेट देत असतात.परंतु ऑगस्ट अखेरच्या चौथ्या विकेंडला शनिवारी पर्यटनात मुरुड –काशिद बीचवर शुकशुकाट दिसून येत होता.

# पेण नगरपरिषद आस्थापना विभाग कर्मचारी दिलीप बांधनकर ३३ वर्षानंतर निवृत्त

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण नगरपरिषद प्रशासनात ३३ वर्षाची प्रदीर्घ सेवा बजावून दिलीप दत्तात्रेय बांधणकर ३१ऑगष्ट २०२५ रोजी निवृत्त होत आहेत.आज नगरपरिषद अधिकारी कर्मचारी वर्गाने त्यांचा सेवानिवृत्तीचा सत्कार सोहळा मुख्याधिकारी जीवन पाटील यांचे अध्यक्षतेखाली सभागृहात उत्साहात संपन्न झाला. यावेळी १९९२ते २००५ बॅच मधील बांधणार यांचे सहकारी व अधिकारी वर्गाने बांधणकर यांच्या प्रशासनातील उत्तम सेवेचा आणि शांत संयमी स्वाभाचे अनेक पैलू उलगडत त्यांचा गौरव केला.



या सेवापूर्ती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक लेखापाल किरण शहा यांनी व्यक्त करताना नगरपरिषद सेवेत कर्मचारी म्हणून रूजू झाल्यानंतर सर्वात जास्त काम वसूली विभागात केले, पाणीपुरवठा विभाग आणि आता आस्थापना विभागात शांत स्वभाव आणि चोख काम करण्याची वृत्ती त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवली,याच कौतुक करावेसे वाटते अशा शब्दांत गौरविण्यात आले..

पाणी पुरवठा विभागाचे रमेश देशमुख म्हणाले जॅकवेल काम असो वा लाईनचे कुठेच कमतरता भासू न देणारा सहकारी होता तर सामान्य प्रशासन विभागाचे विश्वनाथ गायकवाड यांनी आठवणी सांगताना आम्ही सेवेत सोबत लागलेले १८सहकारी भारत दर्शनासाठी चार ही दिशांना फिरलो त्या प्रवास खर्चाचा खडानखडा हिशोब न चुकता देणारा तसेच नेहमी शांत डोक्याने काम करण्याची वृत्ती असलेला माझा सहकारी होता आणि नेहमीच राहील. याशिवाय मुख्याधिकारी जीवन पाटील, बांधकाम अभियंता सुहास कांबळे, शेखर अभंग यांनी मनोगत व्यक्त करुन दिलीप बांधणकर यांना शुभेच्छा दिल्या..

यावेळी नगर परिषद कर्मचारी संघटना, आस्थापना विभाग व इतर विभागातील सहकारी मित्रांनी भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन दिलीप बांधणकर यांचा सपत्नीक सत्कार करुन शासकीय सेवापूर्ती सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या..सेवापूर्ती समारंभ याप्रसंगी मुख्याधिकारी जीवन पाटील लेखाधिकारी किरण शहा बांधकाम विभाग अभियंता सुहास कांबळे,आस्थापनाचे उमंग कदम, आरोग्य विभागाचे दयानंद गावंड, सामान्य प्रशासन विश्वनाथ गायकवाड कर निरीक्षक अमोल नप्ते, गोविंद भिसे,वसुली, पाणी पुरवठा विभाग प्रमुख रमेश देशमुख ,यांच्यासह इतर सर्व कर्मचारी महिला कर्मचारी दिलीप बांधणकर यांचे कुटुंबीयआई इंदू बांधनकर पत्नी सौ साधना बांधणकर दोन मुलं दोन भाऊ बहीण असे या सोहळ्याला उपस्थित होते.

# गौरीला ओवसा देण्यासाठी पारंपरिक सुपांना मागणी वाढली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणरायापाठोपाठ येणाऱ्या गौरीला ओवसा देण्यासाठी पारंपरिक सुपांना मागणी वाढलेली दिसते. बांबूपासून बनवलेले सूप भाऊ हा गौरी गणपतीत बहिणीसाठी नेतो आणि बहीण त्याचा पाहुणचार करते, तर काही ठिकाणी नवीन नवरीला पाच सुपांचा ओवसा देण्याची पद्धत रूढ आहे.

सुपात फळे, वेगवेगळी फुले, दुर्वा, तुळस, आघाडा, पोळ्या, करंजी आदी साहित्याचा ओवसा गौरीला दिला जातो. या वेळी भाऊ बहिणीला साडीचोळी, बांगडीसाठी पैसे देतो. मग साजशृंगार, सौभाग्याचे लेणे परिधान करून महिला पतीच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करून गौरीची ओटी भरतात. येत्या रविवारी गौरीचे आगमन व सोमवारी पूजन असल्याने बाजारात सुपांना मागणी आहे. बुरूड समाजाच्या वतीने गणेशोत्सवातील गौरी पूजनासाठी सूप बनविले जातात. उत्सव–ापूर्वी सूप बनविण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली जाते. बाजारात सध्या बांबूपासून बनविण्यात येत असलेल्या सुपाचा १५० ते २०० रुपये असा दर आहे. बांबूच्या वाढत्या दरासह मजुराची वाढलेली मजुरी यामुळे सूप बनविण्यासाठी बुरूड समाजाला ओढाताण करावी लागते. सध्या पनवेल पंचक्रोशीत सातारा जिल्ह्यातील सूप बनविणारे कारागीर आले आहेत. येथील शेतकरी व बागायतदारांकडून बांबू खरेदी करून सूप बनविण्याची कला ते उपयुक्तपणे साकारतात. स्थानिक बाजारपेठेत या कारागिरांचे ठिकठिकाणी बस्तान दिसते.

# विकासाचं आंतरराष्ट्रीय शहर : पनवेल या विषयावर खुल्या गटासाठी निबंध स्पर्धा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेश कोळी संपादित ‘पनवेल टाइम्स’च्या वर्धापन दिनानिमित्त विकासाचं आंतरराष्ट्रीय शहर : पनवेल या विषयावर खुल्या गटासाठी निबंध स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निबंध स्वलिखित स्वरूपात पीडीएफ फॉरमॅटमध्ये रिर्पींशश्रींळाशीसारळश्र.लो या मेलवर अथवा ९३२२३३९७९७ या व्हॉट्सप नंबरवर पाठविता येईल. निबंधाची शब्दमर्यादा १५०० शब्द इतकी ठेवण्यात आली आहे.

विजेत्यांना पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिन सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात येतील. प्रथम पारितोषिक ३००१, द्वितीय पारितोषिक २००१ तर तृतीय पारितोषिक १००१ असे ठेवण्यात आले आहे. निबंध पाठविण्याची अंतिम तारीख १० सप्टेंबर २०२५ असून परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. अधिक माहितीसाठी ९३२२३३९७९७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे संपादक गणेश कोळी यांनी कळवले आहे.

# माकडाला रेस्क्यू करून जंगलात दिले सोडून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रहिवाशी भागात उपद्रव करणाऱ्या माकडाला एन जे रेस्क्यू टीम आणि वनविभाग पनवेल यांनी रेस्क्यू करून सुखरूपपणे जंगलात सोडून दिले आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्टच्या बाजूला चिंचपाडा येथील एका इमारतीमध्ये माकड शिरल्याची माहिती वनविभागाचे आर एफ ओ गजानन पानपट्टे आणि वनरक्षक जगदीश यांना माहिती देण्यात आली. गेले पाच दिवस हा माकड येथे त्रास देत होता. यावेळी एन जे रेस्क्यू टीमचे नितेश जाधव यांनी आपली टीम पाठवली. राजेश ठाकूर, सौरव म्हात्रे, प्रदीप गाडे, सचिन कुलकर्णी, रितिक सावंत, अश्विन भगत या टीमने आणि वन विभागाने या माकडाला एका तासात रेस्क्यू केले, त्यामुळे इमारतीच्या रहिवासींनी एनजे टीमचे आभार मानले. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास या माकडाला वनरक्षक जगदीश आणि नेचर फ्रेंड सोसायटी या संस्थेचे अध्यक्ष संतोष उदरे आणि नितेश



जाधव यांच्या उपस्थितीत निसर्गात सोडून देण्यात आले.